# सहकार प्रशिक्षण कार्यक्रम

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २४-क नुसार सर्व प्रकारच्या सहकारी संस्थाना त्यांचे संचालक मंडळ, सभासद तसेच कर्मचारी यांचे प्रशिक्षण मान्यताप्राप्त प्रशिक्षण संस्थांकडून घेणे व कलम ७५(२) (viii) नुसार अंदाजपत्रक तयार करणे अनिवार्य आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे कलम ३०-क (८) नुसार सहकारी संस्थांचे अंदाजपत्रक तयार करणे, दरवर्षी प्रशिक्षणासाठी आर्थिक तरतूद करणे व सदर तरतूद प्रशिक्षण घेण्यासाठी खर्च करणे अनिवार्य आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २४-क(१) ला अनुसरून दिनांक १० सप्टेंबर २०१४ रोजीच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाकडील अधिसूचनेनुसार यशदा पुणे या संस्थेला राज्यस्तरीय संस्था म्हणून मान्यता देण्यात आली आहे. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांचे परिपत्रक क्र. प्रशासन/ कलम-२४ क-शिक्षण व प्रशिक्षण/२०१५/१३२, दिनांक १५/०५/२०१५ मध्ये प्रशिक्षण संबंधित उपरोक्त उल्लेखित बाबी स्पष्ट केलेल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर सहकार प्रशिक्षण व संशोधन केंद्र, यशदा पुणे कडून खालील आठ (०८) प्रशिक्षण कार्यक्रम **पुढील तिमाहीच्या कालावधीत** आयोजित करण्यात येत आहेत-

| अ.क्र. | प्रशिक्षण कार्यक्रमाचे शिर्षक | प्रशिक्षण कार्यक्रमांचे कालावधी (पासून ते पर्यंत) |
|---|---|---|
| १ | नागरी / पगारदार सहकारी पतसंस्था व नागरी सहकारी बँका / जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका यांच्यासाठी **‘व्यवस्थापन विकास प्रशिक्षण कार्यक्रम’** | **१०/०४/२०१७ ते १२/०४/२०१७** |
| | | **२७/०४/२०१७ ते २९/०४/२०१७** |
| | | **०४/०५/२०१७ ते ०६/०५/२०१७** |
| | | **१५/०५/२०१७ ते १७/०५/२०१७** |
| | | **२९/०५/२०१७ ते ३१/०५/२०१७** |
| | | **०७/०६/२०१७ ते ०९/०६/२०१७** |
| | | **१५/०६/२०१७ ते १७/०६/२०१७** |
| | | **२६/०६/२०१७ ते २८/०६/२०१७** |

संपर्कासाठी पत्ता - संचालक ,
सहकार प्रशिक्षण व संशोधन केंद्र, राजभवन आवार, बाणेर रोड, यशदा पुणे-४११००७.
दूरध्वनी क्र. ०२०-२५६०८१३९, ०२०-२५६०८२२४, भ्रमणध्वनी क्र. ९४२११४३३९९.
Email- ctr@yashada.org

(प्रशिक्षण कार्यक्रमांच्या कालावधीत फेरबदल करण्याचा अधिकार व्यवस्थापनाला राहील)

# सन २०१७-१८ मधील प्रशिक्षण दरपत्रक

सन २०१७-१८ या कालावधीमध्ये यशदामधील व बहि:स्थ अशा निवासी व अनिवासी स्वरूपाच्या सहकारी संस्थांद्वारा पुरस्कृत प्रशिक्षण कार्यक्रमांसाठी उपस्थित राहणा-या प्रशिक्षणार्थीकरिता प्रशिक्षण शुल्क सवलत योजना खालील प्रमाणे राहील.

| अ. क्र. | प्रशिक्षणाचा तपशील | प्रतिदिन प्रति प्रशिक्षणार्थी शुल्क (रुपये) |
|---|---|---|
| १ | यशदामध्ये एका निवासी प्रशिक्षण कार्यक्रमास उपस्थित राहणा-या एका सहकारी संस्थेच्या एक किंवा दोन प्रशिक्षणार्थीसाठी (प्रति प्रशिक्षणार्थी प्रतिदिन) | मूळ शुल्क- १६००/-<br>+ सेवाकर @१५.००% २४०/-<br>एकूण शुल्क १८४०/- |
| २ | यशदामध्ये एका निवासी प्रशिक्षण कार्यक्रमास उपस्थित राहणा-या एका सहकारी संस्थेच्या तीन किंवा तीन पेक्षा जास्त प्रशिक्षणार्थीसाठी (प्रति प्रशिक्षणार्थी प्रतिदिन) | मूळ शुल्क- १५००/-<br>+ सेवाकर @१५.००% २२५/-<br>एकूण शुल्क १७२५/- |
| ३ | यशदामध्ये एका अनिवासी प्रशिक्षण कार्यक्रमास उपस्थित राहणा-या सहकारी संस्थांच्या प्रशिक्षणार्थीसाठी- फक्त दुपारचे एक जेवण व दोन चहा समाविष्ट (प्रति प्रशिक्षणार्थी प्रतिदिन) | मूळ शुल्क- १०००/-<br>+ सेवाकर @१५.००% १५०/-<br>एकूण शुल्क ११५०/- |
| ४ | बहि:स्थ निवासी प्रशिक्षण कार्यक्रम (प्रति प्रशिक्षणार्थी प्रतिदिन) | मूळ शुल्क- १०००/-<br>+ सेवाकर @१५.००% १५०/-<br>एकूण शुल्क ११५०/- |
| ५ | बहि:स्थ अनिवासी प्रशिक्षण कार्यक्रम (प्रति प्रशिक्षणार्थी प्रतिदिन) | मूळ शुल्क- ७५०/-<br>+ सेवाकर @१५.००% ११३/-<br>एकूण शुल्क ८६३/- |

प्रचलित दराने सेवाकर / जीएसटी संबंधित सहकारी संस्थांना आकारण्यात येईल.

संचालक<br>
सहकार प्रशिक्षण व संशोधन केंद्र,<br>
यशदा पुणे.